# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०६/०९/२०१८

## मालेगाव शहरातील तडीपार गुन्हेगार जबरी चोरीचे गुन्हयात स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात त्रंबकेश्वर व पिंपळगाव शहरातील मोबाईल चोरी करणारे गुन्हेगारही जेरबंद

---

मालेगाव शहरात गेल्या काही दिवसांपासुन जबरी चोरी व चेन स्नॅचिंगचे प्रमाण वाढले होते, त्यामुळे सामान्य नागरीक, नोकरदार तसेच व्यापारी वर्गामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या जबरी चो-या, चेन स्नॅचिंगचे गुन्हयांना आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो., अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. निलोत्पल साो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड साो** यांनी जिल्हयातील मालाविरुध्दचे नाउघड गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेतली व गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा **मालेगाव किल्ला पोलीस ठाणेकडील I गुरनं ५४/२०१८ भादवि कलम ३९२** या गुन्हयाचा समांतर तपास सुरू होता. सदर गुन्हयात अज्ञात दोन आरोपीतांनी दिनांक २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीचे सुमारास एका काळे रंगाचे सी.बी.झेड मोटर सायकलवर भरधाव वेगाने येवुन फिर्यादी श्री.खलीलउल रहेमान हबीबउल रहेमान (वैद्यकिय अधिकारी), रा. नयापुरा मालेगाव यांचा मोबाईल फोन जबरीने हिसकावुन नेला होता.

दरम्यान दिनांक ०५/०९/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना **स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार स्थागुशाचे पथकाने सराईत गुन्हेगार नामे **१) इकलाख अहमद मोहमद इसाक उर्फ इकलाख मुंडी,** रा. कुसूंबारोड, लालानगर, मालेगाव यास मालेगाव शहरातील नंदन टॉवर परिसरात सापळा लावुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले आरोपीचे कब्जातुन वरील गुन्हयात जबरीने हिसकावुन नेलेला **एम.आय.नोट ५ कंपनीचा मोबाईल फोन** व गुन्हा करतेवेळी बनावट नंबर प्लेट लावुन वापरलेली **सी.बी.झेड. मोटर सायकल असा एकुण ८२,५००/- रू. चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीस विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार नामे **२) ताहिर जमाल शाहिद जमाल उर्फ ताहिर डॉन** याचेसह वरील गुन्हा केल्याची कबुली दिली असुन स्थागुशाचे पथक ताहिरचा शोध घेत आहे. ताब्यात घेतलेला आरोपी इकलाख अहमद उर्फ इकलाख मुंडी यास मा.उपविभागीय दंडाधिकारी मालेगाव उपविभाग, मालेगाव यांनी **मालेगाव शहर व नाशिक जिल्हयातुन ०१ वर्षाकरीता तडीपार** केलेले आहे. सदर आरोपी हा तडीपारीचे कालावधीत मालेगाव शहरात वास्तव्यास मिळुन आला असुन त्याचे विरूध्द मुंबई पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. सदर आरोपी व त्याचा साथीदार ताहिर डॉन यांचेविरूध्द मालेगाव शहरात दरोडा तयारी, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, खुन प्रयत्न यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे.

त्रंबकेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील दुगारवाडी धबधबा परिसरात दिनांक ०४/०८/२०१८ रोजी अज्ञात दोनी आरोपीतांनी एका महिलेची पर्स हिसकावुन मोबाईल फोन चोरून नेले होते. सदर बाबत **त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ७८/२०१८ भादवि ३७९** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने संशयीत **इसम नामे सचिन बापु कांबळे, वय २०, रा. सापगाव, ता.त्रंबकेश्वर** व एक विधीसंघर्षित बालकास ताब्यात घेतले. त्यांचे कब्जातुन वरील गुन्हयात चोरून नेलेले दोन मोबाईल **१) सॅमसंग जे २, व २) एम.आय.नोट ५ किं.रू. १३,५००/- चा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला असुन सदर आरोपीने गेल्या महिन्यात सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तसेच स्थागुशाचे दुसरे पथकाने **पिंपळगाव बसवंत पो.स्टे. कडील I गुरनं १११/२०१८ भादवि कलम ३७९** या मोबाईल चोरीचे गुन्हयात आरोपी नामे सोनीराम बस्तीराम गायकवाड, रा. कुसमाडी, ता.कळवण यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन गुन्हयात चोरीस गेलेला रेडमी कंपनीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सहा.पोलीस निरिक्षक श्री. संदिप दुनगहू, सपोउनि सुनिल आहिरे, रामभाउ मुंढे यांचेसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील कर्मचारी यांनी ०१ जबरी चोरी व ०२ मोबाईल चोरी असे एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणुन कारवाई केली आहे.